**जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालय**
**नगर पालिका प्रशासन शाखा**
दुसरा मजला, कॉम्प्लेक्स एरीया, मुल रोड, गडचिरोली
इमेल- dao.gadchiroli५२@gmail.com कार्या-दूरध्वनी क्र. ०७१३२- २२२२०५

क्र.कार्या-१०/नपाप्र/न.पं.सार्व.निवडणूक-२०२१/कावि-६५५/सं.क्र. /२०२१ दिनांक१५नोव्हेंबर, २०२१

## -: सुचना :-
## (जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडून)

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांनी प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी संजय मीणा (भाप्रसे) जिल्हाधिकारी गडचिरोली मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/नपं-२०२१/प्र.क्र.३/का.०६ दि १२.११.२०२१ अन्वये जाहिर केलेल्या नगरपंचायतींच्या सदस्य पदाच्या ना.मा.प्र. आरक्षणाच्या फेरसोडतीकरीता सुधारीत आरक्षण व सोडतीच्या कार्यक्रमानुसार महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०(१) मधीत तरतूदीनुसार गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी नगर पंचायतीच्या आगामी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या नागरीकांच्या मागास वर्ग प्रवर्ग आणि नागरीकांचा मागास प्रवर्गातील माहिला व सर्वसाधारण महिला आरक्षणाची सोडत दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) रोजी सकाळी ११.०० वाजता श्री. यु. ए. तोडसाम, उपविभागीय अधिकारी, चामोर्शी यांचे नियंत्रणाखाली चामोर्शी नगरपंचायतीच्या सभागृहात सोडत कढण्यात येणार आहे व त्याच दिवशी आरक्षणाची रहिवाश्यांच्या माहितीसाठी नगर पंचायत, चामोर्शी, तहसिल कार्यालय, चामोर्शी व उप विभागीय कार्यालय, चामोर्शी येथे प्रसिध्दी करण्यात येणार आहे.

वरील प्रमाणे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) रोजी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या आरक्षणाच्या सोडतीवर किंवा काढण्यात आलेल्या आरक्षणाच्या मसुद्यावर दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ (सोमवार) ते १८ नोव्हेंबर, २०२१ (गुरुवार) पर्यंत कार्यालयीन वेळेत हरकती व सुचना मागविण्यात येत आहेत. उक्त मसुद्यास ज्या लोकांच्या काही हरकती/ सुचना असतील त्यांनी त्या पुराव्यासह संबंधित उप विभागीय अधिकारी/मुख्याधिकारी यांचेकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१ (गुरुवार) रोजी किंवा तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती/ सुचना विचारात घेण्यात येणार नाही.

विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व सुचनांवर सुनावणी दिनांक १९ नोव्हेंबर, २०२१ (शुक्रवार) रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे घेण्यात येईल, याची सर्व संबंधीतांनी नोद घ्यावी.

संजय मीणा (भाप्रसे)
**जिल्हाधिकारी गडचिरोली**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,

गडचिरोली .

उपरोक्त सुचना गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खप असलेल्या वृत्तपत्रात, स्थानिक स्तरावर प्रसिध्द होणाऱ्या वृत्त पत्रात न चुकता दिनांक १६.११.२०२१ (मंगळवार) ला देण्याचे करावे व वृत्त पत्राचे कात्रण या कार्यालयास सादर करावे.

**प्रतिलिपी :- माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.**

१. उप विभागीय अधिकारी, चामोर्शी यांनी सदरची सुचना **दिनांक १५.११.२०२१ (सोमवार)** रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

२. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी सदरची सुचना **दिनांक १५.११.२०२१ (सोमवार)**रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

३. तहसिलदार, चामोर्शी यांनी सदरची सुचना **दिनांक १५.११.२०२१ (सोमवार)**रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

४. मुख्याधिकारी, नगर पंचायत, चामोर्शी यांनी सदरची सुचना **दिनांक १५.११.२०२१ (सोमवार)**रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

५. जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांनी सदरचे सुचना **दिनांक १५.११.२०२१ (सोमवार)** रोजी कार्यालयीन सुचना फलकावर प्रसिध्द करावे व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

**जिल्हाधिकारी गडचिरोली**